ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 1 | October - 2016

Review Of Research

# वर्धा जिल्हातील बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेती वाढचे अध्ययन

डॉ. अनिल वि. सुरकार
व्यवसाय व्यवस्थापन व प्रबंधन विभागप्रमुख
लोक महाविद्यालय, वर्धा.



## सारांश

दारिद्र्य निर्मुलनासाठी अनेक उपाययोजना भारत सरकारने राबविल्या परंतु दारिद्र्यात पाहिजे तेवढी घट झाली नाही. भारत सरकारने दारिद्र्य निर्मुलनासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरु केला परंतु या उपायानेही दारिद्र्य फारसे कमी झाले नाही. देशातील दारिद्र्य दूर करुन नवीन सामाजिक व आर्थिक क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य महिला बचत गट चळवळीत आहे.

वर्धा जिल्ह्यातील महिलांच्या जीवनमानात बचत गटांमुळे काही बदल झालेले आहेत काय, त्यांचे दारिद्र्या कमी झाले आहेत काय, राजकारणात त्यांचा सहभाग वाढला काय, त्यांच्या सामाजिक स्थितीत काही बदल झालेत काय, त्यांच्यात जाणीव जागृती झाली आहे काय व त्यांना स्वत:चे व्यवसाय सुरू करुन आत्मनिर्भर बनता आले काय, या प्रश्नाचे उत्तरे शोधने महत्वाचे आहे. तसेच बचत गट चालवतांना त्यांच्या कुटुंबातून, समाजातून त्यांना काही अडथळे आणले जातात काय, बचत गट चालवतांना कोणत्या समस्या येतात, त्या समस्यांवर त्यांनी कशी मात केली तसेच त्यावर काही उपाय सुचवता येतात काय? व एकंदरीत या सर्व बाबींची जिल्ह्याच्या आर्थिक विकासात काही भूमीका आहे काय? या सर्व प्रश्नांचा अभ्यास करणे महत्वाचे वाटले म्हणून संशोधनासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

## प्रस्तावना

प्राचीन काळापासून ते आजतागायत महिलांच्या स्थितीचा विचार केला तर असे दिसते की, त्या आर्थिक, सामजिक, राजकीय आणि सांस्कृतिक बाबतीत अतिशय मागासलेल्या आहेत. त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी समाजसुधारकांनी व शासनाने आतापर्यंत अनेक प्रयत्न केले, तरी

त्यांना अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. महिलांच्या सर्व समस्यांचे मूळ आर्थिकतेत आहे म्हणून महिलांना आर्थिकदृष्टयाा स्वावलंबी बनवणे आवश्यक आहे व हे कार्य बचत गटाच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे होऊ शकते. महिला स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकत नसल्या, स्वतंत्रपणे उद्योग व्यवसाय सुरू करु शकत नसल्या तरी बचत गटाच्या माध्यमातून त्या स्वतंत्र उद्योग व्यवसाय करु शकतात. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना शिक्षण व प्रशिक्षण, भांडवल, बाजारपेठ, यंत्रसामग्री, कच्चामाल, व्यवस्थापन कौशल्य, तांत्रिक कौशल्य मिळते. त्यामुळे त्यांची उपक्रमी वृत्ती वाढून निर्णय क्षमता, कार्यक्षमता व रोजगार निर्मिती वाढते. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून महिलांच्या उत्पन्नात वाढ होते. महिलांच्या उत्पन्नात वाढ झाली की, आपोआपच समाज त्यांची दखल घ्यायला लागते व त्यांचा मानसन्मान वाढू लागतो.

भारतात अनेक वर्षापासून दारिद्रय निर्मूलनासाठी विविध कार्यक्रमाची अंमलबजावणी शासनाने व स्वयंसेवी संस्थानी केली परंतु त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. अलीकडील दोन दशकात मात्र बचत गट चळवळीमुळे सूक्ष्म वित्तपुरवठयाात वाढ झाली. त्यामुळे महिला उद्यमीमध्ये वाढ होऊन त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या व त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचा आर्थिक विकास झाला.

बचत गटामुळे तुलनात्मक दृष्टयाा महिला आर्थिकदृष्टयाा स्वतंत्र आणि सुरक्षित बनतात. त्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात वाढ होते, साक्षरतेते वाढ होते, निर्णय क्षमता वाढते, संवाद कौशल्यात वाढ होते, उत्पन्न वाढीच्या कार्यक्रमात त्या सहभागी होतात त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढते, त्या आपल्या मुलांना शिकवतात व कुटुंबातील वित्तीय समस्या त्या स्वतंत्रपणे सोडवू शकतात.

बचत गटांमुळे महिलांना कर्ज मिळू लागली. त्याच बरोबर त्यांना आज ज्वलंत प्रश्न मांडण्याची संधी मिळाली. विविध अधिकारी व प्रशासकाबरोबर चर्चा करण्यासाठी व्यासपीठ मिळाल्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात वाढ होऊन धिटपणा वाढला व त्या संकटाचा मुकाबला करू लागल्या.

डॉ. साहू उमेशचंद्र यांनी आदिवासी महिलांसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा अभ्यास केला. अभ्यासात असे आढळले की ओरिसातील स्वयंसेवी संस्थांनी महिलांचे बचत गट स्थापन करून त्यांचे सबलीकरण केलेले आहे.

कुमार पुष्पेश आणि येळने जी. एस. यांनी नांदेड जिल्ह्यातील बचत गटांचा अभ्यास केलेला आहे. अभ्यासात त्यांना असे दिसून आले की, महिला बचत गटामुळे महिलांची छळवणूक थांबलेली आहे तसेच महिलांना कुटुंबात व समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

फावजी अल-सुलतान (अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी) यांनी असे म्हटले आहे की, बचत गटामुळे ग्रामीण भागातील पतपुरवठयाात वाढ होऊन दारिद्रया दूर होऊ शकते. कोफी अन्नान (सचीव, संयुक्त राष्ट्रसंघटना) यांनी असे म्हटले आहे की, सुक्ष्म वित्तपुरवठा हे दारिद्रया विरोधी साधन आहे आणि मानवी भांडवल गुंतवणुकीचा चांगला मार्ग आहे. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी असे म्हणतात की, बचत गटामुळे ग्रामीण भागातील गरीबांच्या दारात

बँक सेवा पोहचली आहे. बचत गटामुळे ग्रामीण लोकांची सावकाराच्या पाशातून मुक्तता झाली आहे. मी नाबार्डला शुभेच्छा देतो की, नाबार्डने बचत गटाची चळवळ शेवटच्या स्तरापर्यंत नेऊन पोहचवावी व बचत गट स्थापनेचे उद्दिष्ट पूर्ण करावे. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील असे म्हणतात की, देशातील दारिद्र्या दूर करून नवीन सामाजिक व आर्थिक क्रांती आणण्याचे सामर्थ्य महिला बचत गट चळवळीत आहे. त्यामुळे ही सुप्त शक्ती जागृत करण्यास प्रोत्साहन द्या, महिलांच्या कर्तृत्वांवर विश्वास ठेवा. महिला सशक्तीकरण हा आपल्या आवडीचा विषय आहे आणि हृदयाच्या जवळ असणारा विषय आहे. महिला बचत गटांमुळे सक्षमतेने काम करण्याच्या संधी बरोबरच आत्मविश्वास वाढविण्यासाठी संघटनेचे बळ त्यांना मिळाले आहे. हिच त्यांची खरी ताकद आहे. (बचत गटांना महाराष्ट्र सरकारने ४ टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याच्या योजनेचा शुभारंभ पुणे येथे दिनांक ९ ऑक्टोबर २००८ रोजी झाला त्याप्रसंगी त्यांनी व्यक्त केलेले विचार)

### सारणी क्रमांक १: बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| **बचत गटातील सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ३२६ | ९३.१ |
| नाही | ८ | २.३ |
| सांगता येत नाही | १६ | ४.६ |
| **एकूण** | **३५०** | **१००** |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये वर्धा जिल्ह्यातील बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९३.१ टक्के बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली आहे. तसेच बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली नसणाऱ्या व या विधानासंबंधी अनिश्चितता दर्शविणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी अनुक्रमे २.३ टक्के व ४.६ टक्के होती. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, वर्धा जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली असणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक २: सदस्यांना बचत गट सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटातील सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २३९ | ६८.३ |
| नाही | ८१ | २३.१ |
| सांगता येत नाही | ३० | ८.६ |
| **एकूण** | **३५०** | **१००.०** |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये वर्धा जिल्ह्यातील बचत गट सदस्यांना बचत गट सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ६८.३ टक्के बचत गट सदस्यांना नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला आहे. तसेच बचत गट सहभागितेमुळे नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला नसणाऱ्या व या विधानासंबंधी अनिश्चितता दर्शविणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी अनुक्रमे २३.१ टक्के व ८.६ टक्के होती. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, वर्धा जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला असणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

## निष्कर्ष,

वर्धा जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे स्त्रियांच्या शारीरिक आरोग्यात सुधारणा झाली असून बचत गट सहभागितेमुळे त्यांना बचतीची सवय लागली आहे. वर्धा जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये वाढ झाली आहे. बचत गट सदस्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या नाबार्डच्या विविध योजनांचा लाभ झाला आहे. सारणी क्रमांक १ मधिल माहितीनूसार बचत गट सदस्यांच्या बचत गट सहभागितेमुळे बँकींग प्रणाली व सेवांसंबंधी जागरूकतेमध्ये महत्वपूर्ण (काई वर्ग मूल्य – ५६३.६८०; P<०.०५) प्रमाणात वाढ झाली आहे. यामुळे प्रचलीत बँक प्रणालीचा व धोरणाचा प्रभाव महिला बचत गटांच्या कार्यावर होत आहे.

## संदर्भ ग्रंथसुची

१. डॉ. आगलावे प्रदिप– संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन नागपूर.
२. डॉ. आगलावे प्रदिप, 'नमुना निवडीचे तंत्र', सामाजिक संशोधन पद्धती, २००७, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
३. डॉ. भांडारकर– रिसर्च मेथॉडॉलॉजी इन सोशिअल सायंस
४. डॉ. कविमंडन विजय– कृषी अर्थशास्त्र

५. डॉ. बोधनकर, सुधीर, अलोगी विवेक– सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन २०१३
६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन– वर्धा